## थोडक्यात...

### महात्मा ज्योतिबा फुले विद्यालयाचा शंभर टक्के निकाल

(संतोष तायडे/दै.धर्मयोध्दा)

**बोरी -** वस्सा येथिल म.जोतीबा फुले कनिष्ठ महाविद्यालयाचा १००% निकाल. वस्सा - जिंतूर तालूक्यातील वस्सा येथिल म.जोतीबा फुले कला व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाने आपल्या उज्ज्वल यशाची परंपरा कायम ठेवली आहे.या वर्षी विज्ञान शाखेचा १०० % निकाल लागला आहे.मुटकुळे दिपिका अरुण ४८३ गुण (८०.५०%) प्रथम,बालटकर सुप्रिया राम ४६६ गुण (७७.६७%) द्वितीय व कुटे साक्षी विष्णू ४५९ गुण (७६.५०%) गुणांसह तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे.तसेचं म.जोतीबा फुले कनिष्ठ महाविद्यालयाचा कला शाखेचा ९३% निकाल लागला आहे. कला शाखेतून शिंदे अंजली शामराव ४४७ गुणांसह (७४.५०%) प्रथम, विभूते आरती राजू ४४४ गुणांसह (७४.०८%) गुणांसह द्वितीय तर शिंपले रुपाली देविदास ४४१ गुणांसह (७३.५०%) तृतीय यांनी तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे.श्री म.फुले शिक्षणसंस्थेचे सचिव रामभाऊ राऊत, अध्यक्ष प्रकाशराव राऊत, प्राचार्य लक्ष्मण बकरे, मुख्याध्यापक सुरेश तावडे,प्रा.राम कटारे,प्रा.विलास शिंदे कोष्टगावकर, कृष्णा राऊत आदिंनी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

### सुशिक्षित बेरोजगारांसाठी सोनपेठ येथे ८ मे रोजी रोजगार मेळावा

**परभणी** जिल्ह्यातील सुशिक्षित बेरोजगार उमेदवारांसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र व केंद्रीय कन्या प्रशाला, सोनपेठ यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ८ मे, २०२६ रोजी सकाळी ८.३० वाजता सोनपेठ येथील केंद्रीय कन्या प्रशाला येथे ''पंडित दिनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा'' आयोजित केला आहे. महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य विकास विभागाकडून जिल्ह्यातील गरजू सुशिक्षित बेरोजगारांना खाजगी क्षेत्रात नोकरीची एक संधी उपलब्ध व्हावी या हेतूने हा भव्य महारोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या मेळाव्यास विविध नामांकित राज्यातील मोठे उद्योजक/कंपन्या व जिल्ह्यातील खाजगी आस्थापना सहभाग नोंदविणार आहेत. दहावी, बारावी, आयटीआय, डिप्लोमा, पदवी इत्यादी शैक्षणिक पात्रता धारक उमेदवारांची क्षेत्र अधिकारी, ट्रेनी ऑपरेटर, लाईफ मित्र, फिल्ड ॲसिस्टंट ट्रेनी, इत्यादी पदांसाठी मुलाखतीद्वारे निवड करण्यात येणार आहे. या पदांसाठी वेतन १० ते २५ हजार असून, अनुभवावरून वेतनामध्ये वाढ होऊ शकते. तसेच मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत खाजगी आस्थापनांमध्ये प्रशिक्षणार्थींची निवड देखील करण्यात येणार असून त्यांना शैक्षणिक पात्रतेनुसार प्रतिमाह ६ ते १० हजार इतके विद्यावेतन ११ महिन्यांकरिता देण्यात येणार आहे. रोजगार मेळाव्यात सहभागी होण्यासाठी जिल्ह्यातील सुशिक्षित उमेदवारांनी नाव नोंदणी महाराष्ट्र शासनाच्या (mahaswayam.gov.in) या संकेतस्थळावर करावी. नाव नोंदणीची सुविधा महारोजगार मेळाव्याच्या ठिकाणी देखील करण्यात आलेली आहे. महारोजगार मेळाव्यात प्रत्यक्ष नाव नोंदणी करण्यासाठी दि. ८ मे रोजी सकाळी ८.३० वाजता केंद्रीय कन्या प्रशाला, सोनपेठ येथे स्वखर्चाने सर्व उमेदवारांनी उपस्थित राहावे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त बेरोजगार उमेदवारांनी सहभाग नोंदवावा तसेच अधिक माहितीसाठी कार्यालयीन वेळेत कार्यालयाच्या दूरध्वनी क्र. ०२४५२-२२००७४ वर संपर्क साधावा, असे आवाहन कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता सहायक आयुक्त प्र. सो. खंदारे यांनी केले आहे.

# आमदार राजेश विटेकर यांच्या उपस्थितीत जनता दरबार संपन्न; नागरिकांच्या समस्या तत्काळ मार्गी

(गणेश जत्ती/ दै.धर्मयोध्दा)

**पाथरी-** येथील पंचायत समिती कार्यालयाच्या सभागृहात दी. ४ मे रोजी आमदार राजेश दादा विटेकर यांच्या उपस्थितीत जनता दरबार कार्यक्रम उत्साहात पार पडला. या दरबारात तालुक्यातील विविध भागांतील गरजू नागरिकांनी आपल्या समस्या व अडचणी मांडत प्रशासनाकडे न्याय मागितला. कार्यक्रमादरम्यान विविध विभागांच्या उपस्थित अधिकाऱ्यांनी नागरिकांच्या प्रश्नांना थेट उत्तरे देत अनेक समस्या तात्काळ सोडविण्याचा प्रयत्न केला. काही विभागांचे अधिकारी अनुपस्थित असल्याने आमदार विटेकर यांनी संबंधित अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष दूरध्वनीद्वारे संपर्क साधून नागरिकांचे प्रश्न मार्गी लावण्याचे निर्देश दिले. यावेळी बोलताना आमदार




विटेकर यांनी, ''जनतेच्या समस्या जाणून घेऊन त्यांचे तत्काळ निराकरण करणे हीच आपली प्राथमिकता असून, पुढील काळातही जनता दरबार नियमितपणे आयोजित करून सर्वसामान्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी आपण कटिबद्ध आहोत,'' असे स्पष्ट केले. या कार्यक्रमाला जि. प. सदस्य अरुणराव कोल्हे, मदनराव भोसले, सभापती सुनीता डुकरे, उपसभापती सचिन अंबुरे, पंचायत समिती सदस्य भगवान दुगाणे, किशन घांडगे, माजी सभापती अनिलराव नखाते, संजय रणेर, अविराज टाकळकर, राजेश ढगे, बंटी पाटील यांसह गट विकास अधिकारी शैलेश वाव्हळे, तालुका कृषी अधिकारी गोविंद कोल्हे, आरोग्य अधिकारी पुजारी व इतर विभागांचे अधिकारी आणि मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन विस्तार अधिकारी (कृषी) संदीपान घुंबरे यांनी केले.

## के. के. एम. कनिष्ठ महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार




(दशरथ शिंदे/ दै.धर्मयोध्दा)

**मानवत-** येथील के. के. एम. कनिष्ठ महाविद्यालयात बारावीतील (कला, वाणिज्य व विज्ञान) गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार उत्साहात पार पडला. एच.एस.सी. परीक्षेत महाविद्यालयाने उत्कृष्ट निकाल देत यशाची परंपरा कायम राखली. विज्ञान शाखा ९२.२६%, वाणिज्य ८९.४२% तर कला शाखा ८१.२९% निकाल लागला. कला शाखेत कु. श्रद्धा राऊत प्रथम, कु. अंजली चव्हाण द्वितीय व कु. वैष्णवी धोपटे तृतीय आल्या. वाणिज्य शाखेत कु. वैष्णवी टेकाळे प्रथम, कु. मयुरी काळे द्वितीय तर कु. वैष्णवी काळे व मयंक तळेकर तृतीय ठरले. विज्ञान शाखेत कु. निकिता वाघमारे प्रथम, कु. भक्ती गोलाईत द्वितीय व कु. किरण गवळी तृतीय आल्या.

कार्यक्रमास अध्यक्ष श्री. विजयकुमार कत्रुवार, सहसचिव विजयकुमार दलाल व संचालक दिलीपराव हिबारे पर्यवेक्षक प्रा.अनिल कापसे उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

सूत्रसंचालन प्रा. विनोद हिबारे यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. बालासाहेब भिसे यांनी केले. कार्यक्रमास विद्यार्थी, पालक व शिक्षकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



माजलगाव - नसरापूर येथे त्या तथाकथित हरामखोर नराधमाला लवकरात लवकर फासावर लटकावे व त्या चिमुकल्या मुलीच्या पालकांना न्याय मिळावा या साठी आज दि.४ .५ . २६ रोजी माजलगाव तहसिलदार श्री संतोष रुईकर यांना निवेदन देतांना नगरसेवक डॉ दिपक देशमुख भाजपा शहराध्यक्ष विनायक रत्नपारखी पत्रकार कमलेश जाब्रस बप्पा देशमुख , सुनिल कुलकर्णी बी . एन कुलकर्णी महाजन संतोष काटकर व अन्य ब्राम्हण समाज बांधव उपस्थित होता. (छाया-मधुसूदन सोनवळकर)

## बोरगव्हाण शाळेच्या गुणवत्तेची परभणी सीईओ कडून प्रशंसा

(मुरलीधर गोंगे/दै.धर्मयोध्दा)

**पाथरी-** पाथरी: परभणी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नतीशा माथुर यांनी आंतरराष्ट्रीय शाळा बोरगव्हाण येथे भेट देऊन तब्बल अडीच तास शाळेची गुणवत्ता पाहणी केली.

शाळेचे व्हिडिओ व उपक्रम पाहून प्रभावित झालेल्या मॅडमनी प्रत्यक्ष भेटीचे नियोजन केले होते. लोकवर्गणीतून उभारलेली भव्य इमारत, सुसज्ज संगणक लॅब, अभ्यासिका, कार्यालय व सर्व वर्गातील इंटरॲक्टिव्ह बोर्डचा वापर पाहून त्यांनी शाळेचे कौतुक केले.

इयत्ता दहावीच्या वर्गात मॅडमनी दिलेले गणित विद्यार्थ्यांनी तत्काळ सोडवले. त्यावर त्यांनी शिक्षक व विद्यार्थ्यांचे विशेष अभिनंदन केले. ''ग्रामीण भागातील विद्यार्थीही गुणवंत असतात, हे या शाळेने सिद्ध केले'' असे त्या म्हणाल्या.

उन्हाळी सुट्टीतही वर्ग सुरू असल्याचे पाहून मॅडमनी ''शाळा ३६५ दिवस चालते'' याची नोंद घेतली. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना त्यांनी उच्च शिक्षण घेऊन मोठ्या पदावर जाण्याचे आवाहन केले.

''संपूर्ण जिल्ह्याला मी बोरगव्हाण शाळेचा




आदर्श घ्यायला सांगते. बोरगव्हाण पॅटर्न महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे,'' असे गौरवोद्गार त्यांनी काढले. जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या शाळेत प्रवेश घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

यावेळी व स्कॉलरशिप वर्ग घेणाऱ्या शिक्षिकांचा मॅडमच्या हस्ते सत्कार करण्यात आला. पाथरीचे वाहुळे, विस्ताराधिकारी घुमरे, केंद्रप्रमुख सानप व गिरी, मुख्याध्यापक, शिक्षक, शाळा व्यवस्थापन समिती, सरपंच व ग्रामस्थ उपस्थित होते.

या शाळेत इयत्ता १ली ते १०वी पर्यंत प्रवेश प्रक्रिया सुरू आहे.

# महाराष्ट्र दिनानिमित्त मूर्ती येथील जिल्हा परिषद शाळेत सांस्कृतिक कार्यक्रम उत्साहात

(किशोर मोरे/दै.धर्मयोध्दा)

**कुंभार पिंपळगाव-** घनसावंगी तालुक्यातील मूर्ती येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत १ मे २०२६ रोजी महाराष्ट्र दिनानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. शैक्षणिक वर्ष २०२५-२६ अंतर्गत आयोजित या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विविध कलागुणांचा आकर्षक आविष्कार सादर केला.

कार्यक्रमात देशभक्तीपर गीत, लोकगीते, नाटिका, पत्रवाचन तसेच चित्रपटावर आधारित नृत्य सादरीकरणांनी उपस्थितांची दाद मिळवली. विद्यार्थ्यांच्या सादरीकरणाला प्रेक्षकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या कार्यक्रमाला लक्ष्मणराव वडले, कुंभार पिंपळगाव केंद्राचे केंद्रप्रमुख खोडदे एस. जे., केंद्रीय मुख्याध्यापक गोतावळे सर, तंटामुक्ती अध्यक्ष बळीबाबा सोळंके यांची प्रमुख




उपस्थिती होती. याशिवाय गावातील प्रतिष्ठित नागरिक, शिक्षकवृंद, शालेय व्यवस्थापन समिती सदस्य, ग्रामपंचायत पदाधिकारी, पालक, ग्रामस्थ, माजी विद्यार्थी व तरुण मंडळ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक म्हणून एकूण ५१,५२१ रुपयांची देणगी जमा झाली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक राजू तौर, सर्व शिक्षक, पालक व ग्रामस्थ यांनी परिश्रम घेतले. दत्ता मामा उढाण यांचे विशेष सहकार्य लाभले, तर रुपसंगम ब्युटीपार्लर, कुंभार पिंपळगावच्या अलका वामन यांनी मेकअपसाठी योगदान दिले.

गावकऱ्यांच्या लोकसहभागातून सुमारे पाच लाख रुपयांचा निधी शाळेच्या विकासासाठी उभारण्यात आला असून, हे गावासाठी आदर्शवत पाऊल मानले जात आहे. आगामी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी इयत्ता पहिलीत २६ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले असून, विद्यार्थ्यांची संख्या सातत्याने वाढत आहे.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, मूर्ती ही शैक्षणिक संकुलाचे आदर्श उदाहरण ठरत असून, भविष्यात शाळेचा विकास अधिक वेगाने होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# स्वामी रामानंद तिर्थ महाविद्यालय अंबाजोगाई १२ वी परीक्षेत अव्वल

(असद शेख/ दै.धर्मयोध्दा)

**पुर्णा -** ( बीड जिल्हा प्रति .मधुसूदन सोनवळकर ) स्वामी रामानंदतीर्थ महाविद्यालाय अंबेजोगाई १२ वी परीक्षेचा वाणीज्य शाखेचा निकाल ९० .६९% तर कला शाखेचा निकाल हा ८७ .२३% लागला आहे वाणिज्य शाखेतून ओव्हाळ अजय याने ८९ .५० % गुण मिळवत प्रथम क्रमांक प्राप्त केला आणि यश लोढा याने ८७ .८३% गुण मिळवत दुसरा क्रमांक प्राप्त केला आहे कला शाखेतून तर फफाळ कृष्णा याने ८१ .८३ % गुण मिळवत पहीला



क्रमांक आणि समर्थ मसने याने ८१.५० % गुण मिळवत दुसरा क्रमांक प्राप्त केला आहे सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष . चंद्रशेखर बर्दापूरकर सचिव कमलाकर चौसाळकर प्राचार्य डॉ . प्रशांत देशमुख ऊपप्राचार्य श्री जितेंद्र देशपांडे प्रा . रमेश सोनवळकर श्रीरामशेप प्रा सुनिता चव्हाण प्रा सविता बुरांडे यांचे ऊपस्थितीत सर्व गुणवंताचा गौरव करण्यात आला राज्यशास्त्र विषयात प्रा . सविता बुरांडे यांचे तर्फे रु . ५००० /- रोख पारितोषिक मान्यवरांचे हस्ते समर्थ मसने यास देण्यात आले

## असोला शिवारात भीषण अपघात; पिकअप पलटी होऊन २३ वर्षीय तरुण ठार, दोघे जखमी

(वजीर पठाण/ दै.धर्मयोध्दा)

**ताडकळस-** पोलीस ठाण्याच्या हद्दीतील असोला शिवारात, हॉटेल साई बारजवळ, परभणीवसमत मार्गावर आज (दि. ३ मे) पहाटे भीषण अपघात घडला. या अपघातात २३ वर्षीय तरुण ठार झाला असून दोघे जखमी झाले आहेत. ही घटना सकाळी सुमारे ५.३० वाजता घडली. मिळालेल्या माहितीनुसार, टेम्पो पिकअप क्रमांक एमएच-२६-सीएच-४१२३ चा चालक अशिष हनमंतराव किन्हाळकर (रा. किन्हाळा, ता. बिलोली, जि. नांदेड) हा वाहन भरधाव




व निष्काळजीपणे चालवत असताना त्याला झोप लागल्याने वाहनावरील ताबा सुटला. त्यामुळे पिकअप पलटी होऊन भीषण अपघात झाला. या अपघातात प्रशिक गौतम भंडारे (वय २३, रा. रामतीर्थ, ता. बिलोली, जि. नांदेड) हा पिकअपच्या चाकाखाली आल्याने त्याच्या डोक्याला गंभीर दुखापत होऊन त्याचा जागीच मृत्यू झाला. तर चालक अशिष किन्हाळकर व अनिल किन्हाळकर हे दोघे जखमी झाले असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. या प्रकरणी सुनिल हनमंतराव किन्हाळकर यांच्या फिर्यादीवरून टेम्पो पिकअप चालक अशिष हनमंतराव किन्हाळकर यांच्या विरोधात गुन्हा रजिस्टर क्रमांक १२४/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेच्या कलम १०६(१), २८१, १२५(अ), १२५(ब) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास साहाय्यक पोलीस निरीक्षक गजानन मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अर्जुन रणखांब हे करीत आहेत.

# तरुणांनी उच्च शिक्षण घेऊन आपले उज्ज्वल भविष्य घडविले पाहिजे- भगवान पैठणे



(सिध्देश्वर गिरी/ दै.धर्मयोध्दा)

**सोनपेठ-** आजच्या तरुणांनी व्यसनांच्या आहारी न जाता उच्च शिक्षण घेऊन आपले उज्ज्वल भविष्य घडविले पाहिजे असे मत व्याख्याते भगवान पैठणे यांनी तालुक्यातील मौजे लासीना येथे भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त बोलताना व्यक्त केले आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच शामसुंदर परांडे हे होते तर व्यासपीठावर प्रमुख मार्गदर्शक तथा व्याख्याते भगवान पैठणे, सिध्देश्वर कराळे, पत्रकार सुग्रीव दाढेल, अभिजित गालफाडे, पिरलवाड एकनाथ कदम,मुनवर शेख, धनराज देवकते, शिवाजी वाव्हळे, आदी मान्यवर उपस्थित होते.पुढे बोलताना पैठणे म्हणाले की, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी बहुजनांना शिक्षणाचे महत्त्व पटवून परिवर्तन घडवून क्रांती केली आहे. ही क्रांती समाजासाठी हिताची व प्रेरणादायी आहे.त्यामुळे आजच्या तरुणांनी व्यसनांच्या आहारी न जाता उच्च शिक्षण घेऊन आपले उज्ज्वल भविष्य घडविले पाहिजे असे मत शेवटी बोलताना व्यक्त केले आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन विनोद दाढेल यांनी मानले आहे.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी वैजेनाथ चौरे, विशाल चौरे, अर्जुन चौरे, प्रभाकर तुपसमिंद्रे,राजेभाऊ लांडगे,तुळशिदास शिंदे, बालासाहेब तुपसमिंद्रे, सिद्धेश्वर चौरे, बंडू चौरे, संतोष चौरे, बाबासाहेब तरकसे, राहुल चौरे यांच्यासह आदींनी परिश्रम घेतले आहे.शेवटी संपूर्ण गावातून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेची ढोलताशांच्या गजरात मिरवणूक काढण्यात आली आहे.

दैनिक धर्मयोध्दा हे पत्र मुद्रक, प्रकाशक व मालक शिंदे रामेश्वर गणपतराव यांनी प्रविण प्रिटींग प्रेस शॉप नं.१४ सुपर मार्केट, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथे छापून धर्मयोध्दा कार्यालय, विकास नगर, कारेगांव रोड, परभणी ४३१ ४०१ (महाराष्ट्र) येथुन प्रसिध्द केले. **संपादक-शिंदे रामेश्वर गणपतराव**

DHARMA YODDHA Daily Publisher, Printer, Owner by- Shinde Rameshwar Ganpatrao, Printed at Pravin Printing press Shop No 14 Super Market Karegaon Road Parbhani 431401 (M.S) And Published Dharmayoddha Karyalaya Vikas Nagar,Karegaon Road Parbhani. 431401 (M.S) Editor By - Shinde Rameshwar Ganpatrao